

योगः कर्मसु कौशलम्

शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय नागपूर

# रूपांजली २०२३-२४

## Govt. College of Art & Design Nagpur

२०२३-२४

**KALAVRUND PUBLICATION**

GOVT. COLLEGE OF ART & DESIGN, LAXMINAGAR, NAGPUR

www.govtcollegeofartanddesign.com

**Editor:**
Ganesh Bobade

**Associate Editor :**
Vinod Chavan

**Co. Committee**
Yogita Kale
Snehal Bunde

**Cover Design & Layout**
Ajay Raibole

**Photography**
Manish Raut

**Back Cover Image :**
'Tulsabai'
Prof. Dhananjay Varma
Collection- GCAD Nagpur

**Illustration**
Ashlesha Manekar
Dhanashri Sottalu
Govardhan Katare
Vaishnavi Bharne
Durga Kalambe

**Published By**
Govt. College Of Art & Design,
Laxmi Nagar, Nagpur - 440022
gcmvnagpur@gmail.com
15 th March 2024
0712 2224680

• अनुक्रम •

निसर्गचित्रकार ना.ब. डिखोळे पान ०७
कलावंत वर्मा सर की महंत कलावंत पान १०
रवी मंडलिकांची कार्यशाळा पान १४
अक्षर 'स्वामी' पान १६
अभ्यासक्रमाबाहेरचा कलावंत पान १८



महाराष्ट्र शासन




## शुभ संदेश

राज्य कला संचालनालयामार्फत विदर्भातील अभिजात कला परंपरा जोपासणारे कला महाविद्यालय म्हणून शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय नागपूरची स्वतंत्र ओळख आहे कला शैक्षणिक परंपरेचा वारसा महाविद्यालयाच्या वार्षिक कला प्रदर्शनाच्या निमित्ताने सर्व सामान्य रसिकांपर्यंत पोहोचत असतो दृश्यकलेच्या माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कलाकृती व त्यांची प्रतिभा कला महाविद्यालयाच्या लौकिकात भर वाढवणारी ठरतात वार्षिक कला प्रदर्शना निमित्ताने केलेल्या स्मरणिकेतून महाविद्यालयाच्या वर्षभरातील आयोजनाचा आढावा अभिव्यक्त झाला आहे

वार्षिक कलाप्रदर्शना निमित्ताने सहभागी व पारितोषिक मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतो.

रुपांजली स्मरणिकेसाठी माझ्या शुभेच्छा.

**राजीव मिश्रा**
**कला संचालक**
**कला संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई**



## मनोगत

नमस्कार मित्रहो , शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये बऱ्याच वर्षाच्या खंडानंतर माझ्यासोबत माझ्या इतर सहकारी अध्यापकाच्या स्वप्नातील 'रूपांजली' हा महाविद्यालयाचा वार्षिकांक पून्हा प्रकाशित करण्यासाठी सर्वांनी अथक परिश्रम घेतले. मागील सत्राचा 'ई'अंक पहिल्यांदा आपल्या समोर आला होता. त्याचेच बिजांकुरण होवून दुसरा अंक सादर करतांना तितकाच आनंद होत आहे . मात्र यावेळी याचे छापील स्वरूप आपणासमोर आहे .

महाविद्यालयाचा अधिष्ठाता म्हणून २०२३-२४ हे माझे पूर्णपणे पहिले शैक्षणिक सत्र आहे. सर्वाधिक महत्वाचे म्हणजे अनेक वर्षापासून सर्वांच्या स्वप्नातील महाविद्यालयीन स्वतंत्र कलादालन सर्वासमोर उभे आहे. चित्रकार प्रा. रवि मंडलिक यांच्या हस्ते उद्घाटन झाले. याचा उपयोग विद्यार्थी मित्रांना निश्चितच होईल. पहिली कार्यशाळा चित्रकार प्रा. रवि मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. महाविद्यालयीन कलादालनाचा आस्वाद घेत कार्यशाळेमध्ये निर्मित झालेल्या चित्रांचे प्रदर्शन प्रदर्शित केले. उपयोजित कला विभागाशी निगडीत लोकप्रिय सुलेखनकार अच्युत पालव यांची सुलेखन (Calligraphy) कार्यशाळा आयोजित केली. यात उपयोजित कलेचेच विद्यार्थीच नव्हे तर रेखा व रंगकला, कला शिक्षक पदविकेच्या विद्यार्थ्यांनी देखील मोठा सहभाग नोंदविला. अध्यापक वर्गाचा सहभागदेखील मोठा वाखाणण्याजोगा होता. त्यामुळे Painting आणि Calligraphy विषय जोडल्या गेले. परिणामी त्यातून उत्स्फूर्तपणे निर्माण झालेल्या कलाकृतीचे 'अक्षररंग' प्रदर्शन उभे राहिले. चित्रकार श्रीधर अंभोरे यांची Illustration कार्यशाळा मार्गदर्शनपर ठरली. माझ्या सर्व विद्यार्थ्यांच्या अहोरात्र मेहनतीने साकारल्या जात असलेले, व सहकारी अध्यापकांच्या मेहनतीने नवनवीन वार्षिक कला प्रदर्शन सर्वांसाठी खुले करतांना मला आनंद होत आहे.

**संजय जठार**
अधिष्ठाता
शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय नागपूर



## रूपांजली विषयी ...

महाविद्यालयाच्या इतिहासात 'वार्षिक अंक' दस्तावेजीकरणाला हातभार लावत असतो; त्यामुळे 'रूपांजली'चे महत्व अधिक आहे. मागचा इतिहास बघता, हा अंक सलगता ठेवू शकला नाही. आता तो सलग निघावा म्हणून आम्ही प्रयत्नशील आहोत. याचीच सुरुवात म्हणून 'इ' स्वरुपात का होईना मागच्या वर्षी हा अंक पुन्हा आला. यावेळी मात्र तो मुद्रण स्वरुपात आपल्या हाती देत आहोत. कलातपस्वी चित्रकार, ना.ब. डिखोळे यांच्या जन्मशताब्दी वर्षात हा अंक येत आहे, याचा मनस्वी आनंद आहे. या निमित्ताने विकास जोशी यांनी डिखोळेंवर लिहिलेला लेख देत आहोत. तसेच ख्यातनाम चित्रकार आणि प्राध्यापक धनंजय वर्मा यांच्या आठवणींना उजाळा देणारा लेखही जोशींनी लिहिलेला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय नागपुर येथे, नामांकित अमूर्त चित्रकार श्री रवी मंडलिक यांची पेंटिंगवरची कार्यशाळा, प्रसिद्ध सुलेखनकार श्री अच्युत पालव यांची सुलेखनावर तर नावाजलेले रेखाटनकार श्री. श्रीधर अंभोरे यांची इलस्ट्रेशनवरची कार्यशाळा पार पडली. यानिमित्ताने अनुक्रमे विनोद चव्हाण आणि गणेश बोबडे यांचे वरील कलावंतावरचे लेख यात आपणास वाचायला मिळतील.


ह्या वर्षीच्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक कला प्रदर्शनातील पारितोषिक प्राप्त कलाकृतींचा यात समावेश आहे. तसेच वर्षभरातील इतर महत्वाच्या उपक्रमांची नोंद छायाचित्रांसह घेतली आहे.

हा अंक विद्यार्थ्यांसोबत इतरांसाठी देखील 'सोनेरी आठवण' म्हणून राहील, यात शंका नाही.

(सोईसाठी मराठी आणि इंग्रजी भाषेचा वापर या अंकात केला आहे.)

**गणेश बोबडे**
संपादक आणि कलावृंद अध्यक्ष





# कला प्रदर्शनाबद्दल...

चित्रकला महाविद्यालयासाठी दरवर्षी येणारे ‘वार्षिक कला प्रदर्शन’ हा कलाउत्सव असतो. विद्यार्थ्यांची लगबघ, पुरस्कारासाठी उत्सुकता, शिक्षकांची घाई, संस्थाप्रमुखाचे नियोजन आणि नेटके आयोजन करण्याकडे कल असतो.

वर्षभराचा शैक्षणिक आलेख पालक, शिक्षक, रसिक, मित्र आणि कलाकृती संग्राहक मिळालाच तर आनंद आणि अभिव्यक्तीला बहार येतो. शिक्षणानंतर याच रास्त वाटेवर ’चित्रकार’ किंवा ’कलावंत’ ठसा घेऊन आयुष्यभर नवनिर्मितीसाठी, स्वतःच्या वैशिष्ट्यपूर्ण ओळखीसाठी धडपड सुरू असते. हाच विद्यार्थ्याचा ‘टर्निंगपॉईंट’ असतो.

शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय नागपूर याच उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी आजपर्यंत कार्य करीत आले आहे आणि पुढेही काही तरी नव्याच्या शोधात राहील.

आमची साथ देणारे विद्यार्थी आपल्या अभ्यासाचा उत्सव साजरा करतात. आधारभूत क्रमिक अभ्यासावर आधारीत कलाकृतींचे प्रदर्शन म्हणजेच कलामहाविद्यालयाचे वार्षिक प्रदर्शन २०२४ आहे.

या प्रदर्शनात कौतुक म्हणून शासकीय व प्रायोजित पारितोषिके विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर दिली जातात. सहभागी विद्यार्थी आणि पारितोषिके विजेत्या सर्व विद्यार्थ्यांचे खूप खूप अभिनंदन..

प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी मदत करणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार.

**विकास जोशी**
प्रदर्शन अधिकारी

जन्मशताब्दी निमित्त


# निसर्ग चित्रकार ना. ब. डिखोळे

**विकास जोशी**

नागपूरात नव्यानं तयार झालेल्या गोवारी उड्डाणपूलावरून बर्डीवर जात होतो. आजूबाजूचं उंचावरून पाहण्याची हौस अधिक होती. उंच इमारती पाहून उंच झाल्यासारखे वाटायचं. पंचशील टॉकीज पहाता पहाता एक लॅण्डस्केप भिंतीवर दिसलं. पाहिलं. पुढेही गेलो. चित्राने कुतूहल निर्माण केलं होतं माझ्यासाठी ... माझ्यापुरतं.

ते चित्र नागपूरातील निसर्ग चित्रकार ना. ब. डिखोळे यांचे आहे हे दुसऱ्या दिवशी मी महाविद्यालयात चौकशी केली तेव्हा कळलं. चित्र पक्के बसले. कुठल्याही निमित्ताने या चित्रकाराला भेटण्याची संधी मिळाली तर..मजा येईल. कधीतरी कल्पना खरी झाली.

१९३८. फिलिप्सची डबल रॉड सेकंडहॅण्ड सायकल ३८ रुपयाला विकत घेतलेली , एक तुटकी ट्रंक आणि तांब्याची घागर एव्हढीच इस्टेट सोबतीला. १४-१५ वर्षाचा तरुण हिंगणघाटच्या रॉबर्टसन हायस्कुलमधून मॅट्रिक ( ११ वी ) पास होऊन १९४९ साली नागपूरकडे निघाला , तो धंतोलीच्या टिळक सभागृहात नव्यानेच सुरु झालेल्या नॅशनल कॉलेजमध्ये प्रवेशासाठी. सीताबर्डीचा मेन रोड, काणे पेंटरच्या दुकानासमोरील गल्लीत किरायानं घेतलेलं लहानसं घर त्याचं निवासस्थान. घरी फक्त आई रुखमाबाई , आर्वी , पुलगांव , हिंगणघाटला नाटकं पाहायला सोबत मुलाला नेणारी . कलेचा वारसा येथेच मिळाला, रुजला. हिंगणघाटच्या बागडदे सरांचाही यात सहभाग. महाविद्यालयातील किटकशास्त्राच्या शिक्षणाबरोबरच अंतर्मनातील चित्रकला शिक्षणाच्या प्रचंड ओढीनं बापुसाहेब आठवलेंचं नागपूर स्कूल ऑफ आर्ट गाठलं. १९४२ मध्ये हा तरुण म्हणजे नागपूरातील चित्रकार नामदेव बळीरामपंत डिखोळे. ५ आक्टोबर १९२३ रोजी जन्मलेला मुलगा. राज्यकला प्रदर्शन २००८ निमित्ताने गांधीनगरात पोहचलो. पहिलीच भेट असल्यानं भी फक्त ऐकत होतो. माझ्याकडे हात करुन '' याला तुमच्यावर लिहायचंय ! '' प्रा. प्रभाकर पाटील मोठया आवाजात म्हणाले. तयारीत असणाऱ्या डिखोळेंनी माझ्या हाती स्वतःचे पुस्तक व चित्रांच्या प्रिंटचा एक सेट दिला. ''तुम्ही लिहिता का ? एकच प्रत आहे, परत द्याल ! '' असं स्पष्ट सांगितलंही. त्यातलंच बर्डीवर एक चित्र पाहिल्याचं मला आठवत होतं .



## बर्डीवर महाराष्ट्र कला विद्यालय

मध्यभारतातील व मध्यप्रदेश सरकारची नागपूरातील डी.टी.सी. पर्यंतचं कला शिक्षण देणारी नागपूर स्कुल ऑफ आर्ट, त्या काळची एकमेव संस्था . त्यातही मोजकेच विद्यार्थी. भारुका भवन म्हणजेच नवनीत इंम्पोरियम हे तिचं कार्यालय. मेहाडिया चौकाकडे जातांना बरोबर उजव्या हातावर मध्यभागी, समोर स्वच्छ पटवर्धन मैदान, पार्श्वभूमीवर सीताबर्डीचा किल्ला, मोठे वृक्ष, नागनदी, संगमेश्वर मंदिर, समोरची भोसलेकालीन संगमरवरी छत्री, असं विलोभणीय दृश्य निसर्गचित्रकाराला साद घालणारं. याच संस्थेत पूढे नावारुपाला आलेल्या रझाला लॅण्डस्केप ची तयारी करतांना पाहिल्याचं डिखोळेंना आठवतं. पुढे गाडे, अंबादास, भांजीभाई, भाऊ समर्थ असे मित्र भेटले. डी.टी.सी. चा अभ्यास पूर्ण करतांच १९४५ मध्ये सेवासदन शाळेत घेतलेलं शिक्षकी व्रत प्राचार्य पदापर्यंत सोडलं नाही . नागपूरात त्या काळी पूढच्या शिक्षणाचं केंद्र नसल्यानं मुबंईला जावं लागत असे. ''इथे काय करता ? एकदा मुंबईचं कला क्षेत्र पाहून या म्हणजे तुमची दृष्टी विशाल होईल आणि सोबत सौ. ला घेऊन जा, तिला स्वयंपाकीण करु नका.'' या देवळालीकरांच्या वाक्यानं श्री व सौ. जे. जे. चे विद्यार्थी झाले. आणि १९५२ मध्ये मुंबईत आले ते सौ. त्रिवेणीसह. देवळालीकरांनी केलेलं सौ. डिखोळेंचे चित्र डाईनिंग टेबलाच्या शेजारच्या भिंतीवर गुरू देवळालीकरांची आठवण देत विराजमान आहे. परिणामी नागपूरात परतल्यावर १९६३ मध्ये महाराष्ट्र कला विद्यालयाच्या उभारणीत सहधर्मचारिणीचं मिळालेलं पाठबळ त्याचीच परिणती होय. बर्डीवर जातांना , डाव्या बाजुला, पंचशील सिनेमाच्या इमारतीत महाराष्ट्र कला विद्यालय उभं आहे. विद्यालयाच्या माध्यमातून कलेचे प्राथमिक धडे गिरविलेले अनेक विद्यार्थी कला शिक्षक व कला क्षेत्रांत स्थिरावलेले दिसतात. नागनदीचं डिखोळेंनी केलेलं निसर्गचित्र गावाला कवेत घेणाऱ्या नदीचं वाटतं. शहराभोवतीची भोसले कालीन भिंत या चित्रात दिसते. इतकं हे लॅण्डस्केप आज वृध्द आहे. डिखोळेमधील निसर्गचित्रकार नागपूर व मुबंईत चित्रांबरोबरच चित्रप्रदर्शनेही करीत होता . १९५९ मधील जहांगीर चे प्रदर्शन व हैद्राबाद आर्ट सोसायटीचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. जे.जे. चा विद्यार्थी म्हणून बघितल्यामुळे' डिखोळे चांगले कला विद्यार्थी, उत्कृष्ट कलाशिक्षक कलावंत होतील, अशा माझ्या शुभेच्छा आहेत ' असा दिलेला जगन्नाथ अहिवासी मास्तरांचा अभिप्राय सत्य झालेला दिसून येतो.

अहिवासींचे मार्गदर्शन आणि कागदाचा पृष्ठभाग किंवा वॉटरमार्क ओळखता यावा इतके पारदर्शक रंग वापरावेत असं मानणाऱ्या हळदणकरांकडून रंगांची पारदर्शकता घेतली. गोव्याचे चर्च, रुरकी, बांद्रयाचा समुद्रतट, ( ज्याच्या मागे त्याकाळच्या प्रसिध्द अभिनेत्री शांता आपटे व दुर्गा खोटे यांचे घर होते अशी आठवण डिखोळे सांगतात ) इत्यादि चित्रात पारदर्शकता दिसते. वरळीचा डोंगर, अपारदर्शक रंगांत रंगविलेला आढळतो. हि ठिकाणं आज ओळखता येत नाहीत.


## मसोजींचे मार्गदर्शन

१९५१ च्या दरम्यान विनायक मसोजी नागपूरात आले त्यांची चित्रनिर्माती सुरु होती. नागपूरात अजिंठा, अंबाझरी, अंबाझरीचा ओव्हर फ्लो, इ. १९५२ मध्ये केलेल्या निसर्गचित्रणात आत्मा आणण्याची किमया शांतिनिकेतनच्या मसोजींकडून दीर्घ सहवास व मार्गदर्शनातून आत्मसात केली. मसोजीप्रमाणेच डिखोळेंच्या सहीचा ठसा तयार केला.' अंबाझरी' च्या चित्रात तो तसाच दिसतो. वाराणसी, काठमांडू, मुंबईतील जहांगीर प्रदर्शनांनी झालेली सुरुवात त्रिनालेचे कला मेळे, आर्ट, हैद्राबाद, दिल्ली, अहमदाबाद, कलकत्ता, गोवा, उदयपूर, जमशेठपूर व रिचमंड आणि विंडसर ( ऑस्ट्रेलिया ) इत्यादि शहरातील निसर्गचित्रांची प्रदर्शने म्हणजे निसर्गचित्रकार यशस्वी झाल्याची नोंदच. नागपूरांत भैय्याजी, मसोजी, याकुब मलक, ( अमर - अकबर - अन्थोनी ) या त्रयींच्या बरोबरींनी कलारसिक डागा व श्रीमंत धनवटयांची साथ मिळाली. मुंबईच्या वास्तव्यांत सडवेलकरांसारखा मित्र भेटला. भारतातील आणि इंग्लंड व फ्रांस मधील वस्तुसंग्रहालयांना व कला

दालनांना भेटीसाठी जाण्याचा योग १९८३ मध्ये प्राप्त झाला. ऑल इंडिया फाईन आर्ट ॲण्ड क्रॉफ्ट्स् सोसायटीने १९८५ मध्ये व्हेटरन म्हणून सन्मान केला. फिरण्याबरोबरच सर्व गोष्टीच्या बारीक नोंदी करणे, कागदाचा तुकडाही फुकट न घालविता चित्र काढणे, लिहून ठेवणे इत्यादिशिवाय स्वतःच्या चित्रांच्या प्रती नोंदीसह प्रकाशित करणे, यातून 'कला क्षेत्रात गेली ५५ वर्षे' नावाचं पुस्तक २००२ मध्ये प्रकाशित केलं. विदर्भ आर्ट सोसायटीची सुरुवात मुंबईहून येथे आलेल्या प्रा. वसंत परब यांनी केली. कार्याध्यक्ष म्हणून काम करतांना मसोजी आर्ट गॅलरी नागपूर गमावल्याची खंत डिखोळेंना शेवटपर्यंत होती. १९९७ मध्ये महाराष्ट्र कला विद्यालयाचा सुवर्ण महोत्सव विद्यार्थ्यांसह साजरा केला. विद्यार्थ्यांसोबत रहाण्यामुळे तरुणाई कायम असल्याची जाणीव आजही होते. ना.ब. ची इस्टेट आणि समृध्दी सौ. रंजना, सौ. शरयु व सौ. प्रतिभा या तीन मुली व विश्वास हा एक मुलगा असून समृद्ध कलावंताचा वारसा सौ. प्रतिभा हिने चित्रकला क्षेत्रात आणि विश्वास यांनी स्थापत्यशास्त्रात प्रवाही ठेवला.' वन्ही चेतवावा लागतो, आपोआप काही होत नसतं.' विद्यार्थी घडविण्याची ओढ कायम असणाऱ्या डिखोळेंची इस्टेट म्हणजे २००८ पर्यंत घडविलेले विद्यार्थी, महाराष्ट्र कला विद्यालय, डिखोळे आर्ट क्लासेस, रझा, देवळालीकर, पळशीकर व स्वत: ची चित्रे...आणि ३८ रु. च्या फिलिप्सच्या डबलरॉड सेकंड हॅड सायकलवर केलेल्या लॅण्डस्केपच्या आठवणी आहेत. चित्रांमागच्या अनेक आठवणी सांगत डाईनिंगरुममधून पहिल्या मजल्यावर, काही चित्रं पाहून झाल्यावर दूसऱ्या मजल्यावरच्या खोलीत गेलो. खोली म्हणजे कुलूपबंद तिजोरी होती, बाथरुमएवढी. ज्याची चाबी चित्रकाराच्या कमरेलाच होती.

आम्ही गप्पा झाल्यावर उजव्या हाताच्या वळणानं गांधीनगरमधून अंबाझरीकडे निघालो. नजरेसमोर ६० वर्षापूर्वीची अंबाझरीकडे सायकल जाईल अशी पाऊलवाट होती. निसर्गचित्रातल्यासारखी. आज ही निसर्गचित्रे जून्या खुणा सांगणारा ऐतिहासिक ठेवा आहे.



# कलावंत वर्मा सर की महंत कलावंत


**विकास जोशी**


‘महंत वैद्यराज बाबा’ तर कला क्षेत्रात ‘वर्मासर’ यांचे देहावसान अशी बातमी पसरली. कुणासाठी अध्यात्मिक तर कुणाची कलात्मक ओढ वाठोड्या कडे जाणारी. पद्मपत्रमिवाभसा वृत्तीची श्रीकृष्ण मंदीराची गादी रीती झाली. दोन्ही क्षेत्रासाठी एवंहवंसं वाटणारं व्यक्तिमत्त्व महंत वैद्यराज यक्षदेव किंवा व्यक्तिचित्रकार प्रा. धनंजय वर्मा, अलिकडे अध्यापकी पेक्षा अध्यात्म्याकडेच त्यांचा अधिक कल म्हणून कलाध्यापन, कलानिर्मितीतून त्यांनी निवृत्ती घेतली. व्यक्तिचित्रण क्षेत्रातही त्यांची गादी रीतीच झाली. महंतांची महती.

मी विद्यार्थी असताना नागपूरातील विद्यार्थ्यांच्या तोंडून वर्मासर ऐकलेले. त्यांच्या पोर्ट्रेटचे काही फोटो पाहिलेले. त्यातली काही ब्लॅक ॲण्ड व्हाईट तर काही कलर पोर्ट्रेट माझ्या लक्षात राहिली होती. माझ्यापुरतं सांगायचं तर मी नागपूरला आल्यावर नागपूर नवीन होते, पण चित्रकला महाविद्यालयातील बरीचशी नावं ओळखीची होती. आमची प्रत्येकाशी पहिली ओळख झाली. आमचा एक नव्या पिढीचा जथ्था आला होता नागपूरात. खूर्चीवर एक शबनम, टेबलावर शासकीय दैनंदिनी आणि शांतपणे स्मित हास्य करीत डायरीत काहीतरी लिहिणारे राजबिंडे व्यक्तिमत्व लक्षात राहिले. माझ्या भिरभिरत्या नजरेनं खूर्चीमागचं एक काम्पोझिशन आणि डाव्या बाजूचे पोर्ट्रेट हेरले आणि वर्मासर हे असावेत अशी खात्री पटली. गुडमॉर्निंगच्या निमित्तानं ओळख नित्यक्रमाची झाली. बाहेर किंवा बाहेरगावी जाताना आम्हाला अर्जावर त्यांची सही घ्यावी लागत असे. ते आमच्या विभागाचे प्रमुख म्हणून. त्यांचा स्वेच्छानिवृत्ती परवानगीची वाट पाहण्याचा हा काळ असावा.

त्यांच्या अर्जाच्या परवानगीचा विलंब आणि मला दिलेल्या आदेशामुळे मी त्यांचा सहकारी झालो. दबकत- दबकत मी दीड एक वर्ष जेमतेम सोबत राहिलो. मॉडेलचे शिक्षकाच्या डायरीत स्केच आणि विद्यार्थी हजेरी, हजेरीतल्या नोंदी, वर्गकाम लिहिणे, तपासणे असे प्राथमिक धडे घेतले. विद्यार्थ्याला सहज, सोप्या पद्धतीने ड्रॉईंग किंवा पोर्ट्रेटमधील लिमिटेड पॅलेट, रंगलेपन सांगण्याची पद्धत पहात होतो. विद्यार्थीही अनुकरण करीत असे. त्यामुळे विद्यार्थी त्यांचा होत असे, आणि वर्मासरही विद्यार्थ्यांचे होत असत. कधी गप्पा करताना आईने दिलेल्या संस्काराबद्दल, तर कधी जेजेतील शिकतांनाच्या, अमरावतीतील आठवणी सांगत. कलावंताचा हळवा स्वभाव आज लक्षात येतो. सेवानिवृत्तीनंतर महंत वैद्यराज यक्षदेव यांचीच भेट झाली होत राहिली. आवर्जून गप्पांसाठी वाठोड्याचे आमंत्रणही घेत राहिलो. हा योग आला तेव्हा वर्मासर मनमोकळे बोलले आणि माझे ही दडपण दूर झाले.

वाठोडा शुक्लेश्वर पूर्णा नदीवर बसलेले गाव. पूर्व वाहिनी पात्र. चक्रधर स्वामी आणि भट्टसंप्रदायाचा पदस्पर्श झालेलं गाव. नदी तीन बाजूंनी वेढलेली. जवळच रिध्दपूर क्षेत्र. अमरावती दर्यापूर रस्त्याच्या थोडंस आतल्या बाजूस. गावाला आमराई, बोरबन हिरवीगार. गावात डाव्या हाताला लक्ष्मी नारायण मंदीर. दत्तमंदीर नदीकाठी. आयुर्वेदाचार्य मुरारीमल्ल यक्षदेवाचे शिष्य गुलाबसिंह वर्मा यांच्या मालकीचे. राजस्थानातून आलेल्या राजपूत कुटुंबावर दत्त व कृष्णभक्तीचा संस्कार. काव्यरचनेचा वारसा गुलाब सिंहाना मिळालेला होता. वर्मा कुटुंबाला हा अनुबंध असावा. लाकडी काळ्याशार उघडखांबी तुळया वापरून बांधलेले देवालय. देवालयात पंचअवतारी कृष्णमुर्ती, साजशृंगार असं चेतन अधिष्ठान. धार्मिक संस्काराचा संचार घरातल्या चराचरात. गावात वऱ्हाडी धाटणीचे लादणी व माडी असणारे घर. माडीच्या भिंतीवर कृष्णलीलेतील प्रसंगचित्रे काढलेली. नक्षीदार फर्निचरही सांभाळून ठेवलेले. अमरावतीच्या गंगात्रे चित्रकाराने काढलेली अप्रतिम चित्र मालिका १९४३ साली काढून घेतलेली. वॉलपेटींग म्युरल. कृष्ण- राधा, शिवाजी महाराज आणि राणा प्रतापाचं मिनिएचर फॉर्ममधील व्यक्तिचित्र लक्षवेधक. दरवाज्याच्या पटावर नक्षीकाम , कोनाड्याला अलंकरण , षटकोनी अलंकारीक मार्बल टॉपचा टेबल , जूनी भांडी जपलेली असं जागोजागी कलासंस्कार जपणारं वेगळं घर. कृष्णाच्या चित्रावर 'मामेकं शरणं व्रज' किंवा चित्रकार गंगात्रे क्षणमात्रे सजवुनी सकल गात्रे । चित्रित विचित्र संकेत करिती जणु पात्रे श्रश्र' अशा काव्यपंक्ती भित्तिचित्रावर आहेत. काव्यरत्न पुरस्कार मिळाल्यानंतरचे एक वडीलांचे छायाचित्र लक्षवेधी आहे. धनंजय गुलाबसिंह वर्माचा जन्म १८ जानेवारी १९४६ ला याच घरात झाला. गावातल्या शाळेत मोठ्या भावासोबत सातवी पर्यंत व पुढे कलानिकेतन, मनीबाई विद्यालय अमरावती येथे अकरावीपर्यंतचे शिक्षण झाले. कलेचा संस्कार आणि भौतिक शास्त्राची आवड असं काहीसं सुरु होते. नागपूरातील आठवलेंची कलाशाळा, शांतिनिकेतन किंवा जेजे ठरवतांना मुंबईतील जेजेचा प्रवेश १९६३ मध्ये नक्की झाला. प्रा. संगवाई, प्रा. संपती, प्रा. सुखडवाला, प्रा. सोलापूरकर, प्रा. कदम, प्रा. सडवेलकर, प्रा. पळशीकरांचे मार्गदर्शन जेजेत मिळाले. कोलते , साळवे असे आजचे प्रसिद्ध चित्रकार वर्गमित्र झाले. वसंत परब यांच्या 'बसचे तिकिट' नाटकात भूमिका केल्याने अमोल पालेकर मित्र झाला . नाट्य व नृत्य कलेच्या आवडीने जमलेल्या ग्रुपने जेजेत पहिल्यांदा तमाशाचे सादरीकरण केले. तेव्हा तमाशा उपहासानेच सादर होत असे. नाटकाला जेजेत खतपाणी मिळाले. अभिनयापेक्षाही व्यक्तिमत्व हेरण्याची आणि त्याचे रूपांतर पोर्ट्रेट मध्ये करण्याच्या वृत्ती कडे कल वाढला अन्यथा एक स्मार्ट अभिनेता आपल्याला मिळाला असता. जेजेतील हे मंतरलेले दिवस असावेत. जेजेच्या समृद्ध पॅलेट परंपरेतून व्यक्तिचित्रणाचे धडे देणारा कलाशिक्षक विदर्भाला मिळाला. आजही ही परंपरा आहे, त्यांचा ठसा आहे. १९६८ जीडी आर्ट, तर १९६९ ला म्युरल डेकोरेशन पूर्ण केले. नागपुरातील आमदार निवासासाठी केलेले एक म्युरल याचीच साक्ष आहे. व्यक्तिचित्रासाठी मिळालेल्या बॉम्बे आर्ट सोसायटी, डॉली करसेटजी, उषा देशमुख पुरस्काराने वर्मांना मुंबईत स्थिरावण्याची आशा निर्माण केली. १९६९ साठी जेजेत अधिव्याख्याता पदावर रुजू होण्याच्या पत्रानं बळ वाढले. शिक्षक




झाल्यानं नवी उर्जा मिळाली. धनंजय मधील कलावंत घडण्यासाठी निरक्षर आईने मदळसा मातेची भूमिका घेतली होती. रंगीत मणी आणि गुंडयापासून तयार केलेला पोपट आणि शिवाजी महाराज घरातल्या भिंतीवर फ्रेममध्ये आहे. आई अनसूयाबाईकडून मिळालेली वारसा अभिव्यक्ती बळकट झाली. लहान वयापासून या कलाकृतींनी पोषक वातावरण निर्मिती केली होतीच. जेजेत शिकत असतांना प्रसिद्ध व्यक्तिचित्रकार गोपाळराव देउस्कर तर कधी सातवळेकरांसारख्या व्यक्तिची प्रात्यक्षिके जवळून पाहता आली होती. अत्यंत शिस्तीत डेमो दाखविणारे हे कलावंत. वर्मासरांच्या पॅलेट पोर्ट्रेट मध्ये हीच शिस्त दिसते. व्यक्तिचित्रणात हुबेहुबपेक्षाही व्यक्तिचे भाव आणि अंतर्मनाचे प्रकटीकरण होत असेल तरच ते उत्तम पोर्ट्रेट असे वर्मासरांचे मत असे त्यांचे विद्यार्थी सांगतात. म्हणूनच कोणत्याही वर्गातील विद्यार्थी त्यांचा होत असावा. व्यक्तीचा भाव आणि काव्यात्म भाव नैसर्गिकपणे त्यांच्या पोर्ट्रेटमध्ये दिसून येतो. ही त्यांच्या पोर्ट्रेटची वैशिष्ट्य म्हणता येतील.


सेझा, रेम्ब्रा, गोगॅ, व्हॅन गॉगच्या पोर्ट्रेटचा अभ्यास शिकत असतांना सुरु होता. पळशीकर व कदमांकडून वर्मानी रंगलेपन तंत्र आत्मसात केले. एकदा नागपूरात व्यक्तिचित्रणासाठी प्रा. कदमांना मॉडेल हवे होते. गुरुने शिष्याला मॉडेल म्हणून निवडले. सात्विक व राजबिंड्या भावाभिव्यक्तिचे पोर्ट्रेट शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयाच्या संग्रही आहे. माणसाच्या मनातील भाव भावनाच्या प्रकटीकरणासाठीचे साधन म्हणून पोर्ट्रेट मध्येच स्वतःची ओळख नागपूरात निर्माण केली. विद्यार्थ्यांसाठी स्टील लाईफ, क्रिएटीव्ह पेंटींगही केली, स्वतःच्या व्यक्तिमत्वासारखीच.

विद्यार्थ्यांची आकलन शक्ती ओळखून शिकविणारे वर्मासर विद्यार्थी प्रिय होत होते. १९७४ साली सातवळेकरांच्या आग्रहाखातर मुंबई सोडून नागपूर येथील महाविद्यालयात आले. विदर्भाचे आणि नागपूर चे व्यक्तिचित्रकार झाले. स्वेच्छानिवृत्ती घेईपर्यंत ड्राईंग, पोर्ट्रेट, लाईफ पेटींग हे विषय त्यांचेच राहिले. नागपूरला व्यक्तिचित्रासाठी मॉडेल्स तयार करावी लागत. कधी कर्मचारी तर कधी आजूबाजूची ओळखीच्या माणसांची मॉडेल म्हणून निवड केली. ओळखीच्या व्यक्तिच्या चित्रांमुळे विद्यार्थ्यांनाही ती व्यक्ति आपली वाटू लागली. ओळख पटू लागली. इथे मुंबई सारखी न्युड, सेमीन्युड फारशी होत नसत, न्यूड चित्र नागपुरात नवी वाटली. १९८२ मध्ये नागपूर विद्यापीठात एमएफए क्रिएटीव्ह पोर्ट्रेटला प्रवेश

घेतला. तेव्हा अशी मुभा होती. अध्ययन आणि अध्यापन एकत्र करताना केलेली व्यक्तिचित्रे अभ्यास आणि प्रायोगिकी आहेत, बॉम्बे स्कूलची आहेत. 'कांग्रा शैलीतील सर्वज्ञ श्रीकृष्ण चक्रवर्ती' या विषयावर प्रबंध लिहिला. कलासाधन आणि अध्यात्माची सांगड सिद्ध करण्याचा हा साधकाचा प्रयत्न होता. शैक्षणिक चित्र आणि व्यावसायिक कामे सारख्याच अभिव्यक्तीतून प्रा. वर्मानी केली. पुण्याच्या आगाखान पॅलेसमधील 'गांधी दर्शन', मुंबई विधानभवनासाठी 'लोकमान्य टिळक' केले. 'इंदिरा गांधी', 'छत्रपती शिवाजी' आणि नागपूर विद्यापीठासाठी माजी कुलगुरूंची केलेली व्यक्तिचित्रे त्यापैकीच आहेत.

व्यक्तिचित्रणातून मिळालेला आनंद निष्काम कर्मयोग्यासारखा स्विकारला, म्हणूनच वर्मासरांचे पोर्ट्रेट प्रात्यक्षिक पहातांना विद्यार्थ्यांना सात्विक आनंदाची अनुभूती होत असे. १९८५ मध्ये स्थापन झालेल्या विदर्भ आर्ट सोसायटीचे सदस्य म्हणून नागपूरात व्यक्तिचित्रांची प्रदर्शन केली. यातील बरीचशी चित्र त्या त्या मॉडेलच्याच संग्रही आहेत. यात त्यावेळच्या अनेक चित्रकारांचा सहयोग होताच. व्यक्तिचित्रांची प्रदर्शने पुढे नागपूरात रूढ झाली.

विविध व्यक्तिगत पुरस्कार, सन्मान स्विकारून स्वेच्छानिवृत्तीनंतर वृत्तीनेच धनंजय वर्मा समाजकार्यासाठी कार्यरत झाले . नवचैतन्याने. चैतन्य महाप्रभूंचा महानुभाव विचार, साहित्य, तत्त्वज्ञानाचा प्रसार- प्रचारासाठी उर्वरित जीवन समर्पित केले. वाठोड्यातील दत्तमंदीर संस्थानची महंत कुळातील यक्षदेवाची वारसा गादी कलावंत धनंजय वर्मांना खुणावत होती. हीच ओढ, अद्वैत वृत्ती स्विकारणारे वर्मासर परिवाराचे 'बाबा' झाले. ही वृत्ती साधकाची होती. सक्तीची नव्हती. साधनेच्या सौंदयानुभावाचा प्रत्यक्ष आस्वाद घेतांना 'महंत वैद्यराज यक्षदेव' झाले. महानुभाव साहित्य संम्मेलन अचलपूर २०१२ चें संमेलनाध्यपद यक्षदेवांना मिळाले. सर्वज्ञ चक्रधर राष्ट्रीय सन्मान सारथी समाजसेवी संघटना पुरस्कार महानुभाव समाजसेवेची फलश्रुती आहे. यक्षदेवांसाठी हा सहज स्पर्श आनंददायी असावा. कृष्ण भक्तीत तल्लीन झाल्यावर सुद्धा कलावंतपण विसरले नाहीत. मंदिराच्या प्रवेशव्दारासमोर अंगणात सिरॅमिक मोझॅक रांगोळी, बाजूच्या भिंतीवरील सिमेंटमधील सिरॅमिक म्युरल, गाभाऱ्यात कळसापर्यंत केलेली रंगीत काचचित्रे, देवाची आभूषणे, सजावट, वस्त्रालंकार कलावंत यक्षदेवाची निर्मिती आहे, कलाकृती आहे. ही कलावंताची अद्वैत वृत्ती. जूने विद्यार्थी, मित्र किंवा सहकारी, कुणीही लहान मोठा महानुभावी भेटला की त्याच्याशी संवाद करणे, ख्याली खुशाली विचारणारे यक्षदेव आता भेटणार नाहीत हे नक्की. त्यातही चित्रकार भेटला की विस्मृतीत गेलेल्या आठवणी आठवत असे. डेमो साठी कधी पॅलेट, ब्रश हाती आला तर पोर्ट्रेट आर्टिस्ट म्हणून उभे रहात. आपल्या परंपरेनुसार. कॅडेमिक आणि लिमिटेड पैलेटमधून कॅनव्हॉसवर समोरच्या मॉडेलला सहज उतरविणारा लीलाव्रती. बोलण्यातून कायम कृपाळू कृष्ण आस आणि ध्यास होता मायाळू कृष्णभक्तीचा. कृष्ण भक्ती करता करताच कृष्णचरणी लीन झालेले कलावंत का महंत कलावंत.



अमरावतीच्या राज्य कला प्रदर्शनाच्या निमित्ताने कॅटलॉगसाठी लेखन करण्यासंदर्भात मी आणि मनीषी दाभाडे वाठोडा गेलो होतो. या प्रदर्शनात त्यांचा शासनाच्या वतीने सत्कार होणार होता. दिवसभर गप्पा टप्पा, जुने फोटो,डायरीतील नोंदी, चित्रं, गाव, घर, प्रसाद, रबींदोसंगीत आणि मंदीरही. स्मृती आणि विमृस्तीतल्या आठवणींना उजाळा देत यक्षदेव रमले होते कलाविश्वात. व्यक्तिश: त्यांचा व माझा कुठलाही बंध-अनुबंध नव्हता. निवृत्तीच्या वाटेवरचा जेमतेम दीडेक वर्षांचा सहवास.

त्या दिवशी अनुभवलेले कलावंत वर्मा सर किंवा यक्षदेव महंत. ज्याचा त्याचा द्रुष्टांत. एव्हढाच माझा द्रुष्टांत. एव्हढीच माझी स्मृती.



# रवी मंडलिकांची कार्यशाळा

**विनोद नानाजी चव्हाण**

आकाश, अवकाश, प्रकाश, अमूर्त असाच काही प्रवास... काही दिवसांपूर्वी कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आला निमित्त होते कार्यशाळेचे. महाविद्यालयात विविध कार्यक्रमांतर्गत डिसेंबर महिन्यात ज्येष्ठ अमूर्त चित्रकार रवी मंडलिक यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. रवी मंडलिक अमूर्त कलाकार, ते मूळचे महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील अचलपूर या गावाचे. ते आता मुंबईच्या धकधकीच्या जीवनाचा भाग झाले असले तरी त्यांना त्यांच्या मूळ गावी असलेल्या जंगलातून ते प्रेरित होतात . निसर्गातून प्रेरित होऊन त्याचा अनुभव कॅनव्हास च्या अवकाशात मोकळे करतात. त्यातील पोत, आकार,रेषा, प्रकाश, छाया टिपण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. या प्रतिभावान चित्रकारांनी सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई येथे कलेचे शिक्षण घेतले. आणि पूर्णवेळ चित्रकलेचा ध्यास घेण्यापूर्वी त्यांनी काही काळ अध्यापनाचे कार्य केले. परंतु पूर्ण वेळ चित्र काढण्याच्या अट्टहासामुळे त्यांनी स्वतःला झोकुन दिले.

निसर्गातील ऊर्जा, पाच निराकार घटकातील सत्व पकडण्यासाठी त्यांना प्रेरित करतात. ऊर्जा निराकार असली तरी ती चल आहे आणि मी तो टिपण्याचा प्रयत्न करतो असे ते म्हणतात.

रंगाचे समायोजन सामान्यतः आनंददायी असतात खूप तेजस्वी नसतात. तसेच ते एकमेकांशी भिडतात पुसट, धूसर, धुरकट दिसतात. स्मरणात राहिलेल्या अनुभवापासून जीवनातील छोट्या छोट्या गोष्टींना आपल्या कला चित्रात स्थान देतात. सुर्योदय, सुर्यास्त, पोर्णिमा, अमावस्या सदृश्य असे तारे त्यातील रहस्य हे त्यांचे दृश्यात्मक तसेच रंगाच्या माध्यमातून त्याच्याशी ते संवाद करतात भू वरील स्वअस्तित्व ते पूर्णवेळ अनुभवतात व त्याला अवकाशात उतरवण्याचा प्रयत्न करतात.

लद्दाखला दिलेली भेट त्यांच्या कला, कला प्रवासाला कलाटणी देणारा काळ होता. तेथील दृश्य, प्रकाश, आकार, डोंगर, नदी अशा निसर्गाची खरी प्रचिती येथून त्यांना आली असे ते म्हणतात. ॲक्रॅलिक रंगाचा वापर करतात त्यांच्या शैलीसाठी ते उपयुक्त आहेत कारण ते लवकर सुकतात तसेच त्यामधून निर्माण होणारा पोत आणि पटल हे त्याच्या दृश्यात्मक अनुभूतीला प्रेरक व अनुरूप आहेत. रंगातील पारदर्शक पोत याचे अनुभवात्मक प्रकटीकरण हे सरांच्या चित्राचा आत्मा बनतो. हाच प्रवास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावा याकरिता प्रामुख्याने कलाकार या शाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सरांच्या दीर्घ अनुभवाची साथ मिळाली. दिसणे आणि बघणे व त्याचे अनुभवात्मक प्रगटीकरण करणे याची प्रचिती विद्यार्थ्यांनाच आली विद्यार्थ्यांनी स्वतःवर विश्वास ठेवून कला साधना कशी करता येईल याबद्दल मार्गदर्शन केले. मुक्तपणे चित्र काढणे ढासळून न जाणे तसेच लक्ष गाठायचे असेल तर विचलित न होता अविरत कार्य करत राहणे याकरिता सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांसोबत मिसळून त्यांच्याशी चित्रभाषा संवाद करून प्रोत्साहन सरांनी दिले. तसेच त्यांचा कला प्रवास हा शेवटच्या दिवशी मोकळ्या गप्पाटप्पा करत प्रोजेक्टर द्वारे चित्र दाखवून निसर्गाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन त्यांनी दृश्यात्मक कसा टिपला आहे याचा अनुभव मुलांना दिला. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी रेखांकन चित्र व मोकळेपणांनी सरांशी संवाद साधून स्वतःच्या प्रश्नांची सरांकडून उकल करून घेतली जी विद्यार्थ्यांच्या पुढील कला प्रवासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची होती. विद्यार्थी या कार्यशाळेच्या अनुभवातून प्रोत्साहित होऊन मुक्तपणे तसेच प्रबळ विश्वासातून चित्र निर्मिती करीत आहे जी ऊर्जा सरांनी मुलांना दिली ती नक्कीच सर्वांना प्रेरणादायी आहे. तसेच या कार्यशाळेच्या आयोजनामुळे झालेले बदल हे विद्यार्थ्यांच्या कला प्रवासात मोलाचे आहे.

सरांचा या विश्वाच्या दडलेला अर्थ शोधण्याचा शोध चालूच राहील आणि सरांचा शोध विश्वाच्या पोकळीप्रमाणे आहे, त्याला सीमा नाहीत. चित्र हीच त्यांची भाषा चित्रातून ते अनुभव पकडण्याचा प्रयत्न करतात अशा या गुढ निसर्गाचा प्रत्यय मुलांना देखील आला. याबद्दल महाविद्यालयातील विद्यार्थी सदैव ऋणी राहतील.







# अक्षर ‘स्वामी’

**गणेश बोबडे**

कॅलिग्राफी (सुलेखन ) म्हटलं की , आपसूकच अच्युत पालव हे नाव आठवतं. इयत्ता आठवीत असताना शाळेच्या फळ्यावर ‘ सुंदर अक्षर हाच खरा दागिना’. असा सुविचार त्यांनी लिहिला होता. पुढे या सुंदर अक्षरांच्या वळणानेच त्यांच्या आयुष्याला नवे वळण मिळाले. त्यांचे गुरु र. कृ. जोशी यांचाच सुलेखनाचा वारसा ते चालवताहेत, पालव यांचं सर्वात मोठे योगदान काय असेल तर त्यांनी कॅलिग्राफी सर्वसामान्यांपर्यंत पोहचवलीय. तुम्हाला माहीत असलेला एक चित्रकार सांगा, अस कुणाला विचारलं तर पटकन ‘हुसेन’ यांचं नाव घेतो, तसं कॅलिग्राफी साठी पालव यांच नाव घेतल्या जातं. कला विद्यार्थ्यांमध्ये आणि सामान्यांपर्यंत कॅलिग्राफी रुजवणं नक्कीच सोपं नव्हतं. त्यासाठी खूप काळ पालव यांना द्यावा लागला, प्रचंड मेहनत घ्यावी लागली. खरंतर कॅलिग्राफीवर काम करून मार्केटमध्ये उभं रहाणं तसं आव्हानच होतं, पण हे शिवधनुष्य उचलायची हिम्मत पालवांनी दाखवलीय आणि त्यात यश संपादन केलं .

सुरुवातीला 'मोडी' लिपीवर अभ्यास करून हळूहळू इतर भारतीय लिप्यांवर त्यांनी अभ्यास केला. अक्षरांची वेगवेगळी वळणे समजून घेऊन अधररचनेला सौंदर्याची जोड दिली. भारतभर प्रवास करून ठिकठिकाणी कार्यशाळा घेतल्या. पुढे देश - विदेशात भारतीय लिप्यांचा आणि खास करून देवनागरीचा झेंडा फडकवला, ही मराठी जनांसाठी अभिमानाची बाब होय.

कागदावरची ही अक्षरं पुढे छत्र्यांवर दगडांवर, फ्लेक्सवर, कॅनव्हॉसवर, भिंतीवर तर कधी चक्क स्त्री मॉडेलच्या अंगावर देखील ऐटीत उभी राहीली, झळकत राहिली. पेन, बोरु, ब्रश ह्या पारंपरिक साधनांचाच वापर न करता झाडू, मॉप, इंजक्शनची सुई अशा विविध, कल्पनेच्या पलिकडच्या साधनांचाही वापर करून पालव दर्शकांना चकीत करतात .

पालव हे अक्षरांकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून बघतात, त्यामुळेच ती अक्षरं अमूर्तरुपात कॅनव्हासवर येतात आणि अमूर्त चित्रांचाही आनंद देतात याची निर्मिती मोठी देखणी असते, प्रचंड मोठा कॅनव्हास समोर असतो, त्यावर रोलर , ब्रश धावत असतो, कधी रंगांची बकेट कँनव्हासवर ओतल्या जाते... पालव कॅनव्हास बरोबर जणू होळीच खेळतात, पूर्ण रंगून जातात आणि बघणारा देखील !

वेगवेगळ्या लिप्यांचा ढंग, लहेजा, डौल पालव नेमकेपणाने पकडतात. विठ्ठल, गणपती या सारख्या शब्दातून अक्षरचित्रच ते उभे करतात. आणि रसिकांची वाहवा मिळवतात. छत्र्यांवरच्या अक्षरांच्या कार्यशाळा तर खूप गाजल्या, गाजताहेत. पावसाळा आला की पालवांच्या छत्र्याँची आठवण येतेच. छत्र्यांवर अधररंगांचा पाऊसच ते पाडतात. ही प्रयोगशीलता पाहणाऱ्याला मंत्रमुग्ध करते. पुढे इतर कॅलिग्राफी करणाऱ्यांनीही अशा कार्यशाळा घ्यायला सुरुवात केली, आणि तसा प्रघात पडला. टी शर्टवर त्यांनी काढलेली अक्षरं समोरच्याला आकर्षित करतात. घरातल्या भिंतीवर 'अक्षरम्यूरलचा' नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. एकदा असे काम करत असताना एसी मध्ये आला म्हणून काही अक्षर त्यांनी एसी वरही येऊ दिले, गमतीचा भाग म्हणजे पुढे इतरांनी आमच्या एसी वर अक्षरं हवी म्हणून मागणी केली. पैसे हे वाजवूनच घेतले पाहिजे आणि मार्केटमध्ये नवनविन ट्रेंड निर्माण करायला हवेत , असा कानमंत्र ते जाहीरपणे देतात.

डायऱ्या, कॅलेंडर आदी कामात पालवांची प्रतिभा दिसून येते. विवेक रानडे यांची फोटोग्राफी, गुलजार यांची शायरी आणि पालव यांची अक्षरं हा सुंदर मिलाफ टेबल कॅलेंडरवर बघावयास मिळाला होता. आजही काही जणांच्या संग्रही ते पहायला मिळते.

प्रचंड काम करूनही न थकणाऱ्या पालवांची 'अक्षर यात्रा' जोमाने पुढे पुढेच जात आहे. १९८८ ला दूरदर्शनवर , पेशव्यांवर आधारीत 'स्वामी' मालीका आली होती, त्यातले अक्षरांकनाचे काम पालवांनी केले होते. तेथून सुरु झालेला हा प्रवास अक्षर 'स्वामी' पर्यंत पोहचला, असे म्हटले तरी वावगे होणार नाही .




# अभ्यासक्रमाबाहेरचा कलावंत

**गणेश बोबडे**

रेखाटन प्रधान चित्रांकन करणारे फार थोडे कलावंत आहेत, त्यात प्रामुख्याने नाव घ्यावे असे म्हणजे श्रीधर अंभोरे! रुढार्थाने त्यांनी चित्रकलेतलं कुठलंही शिक्षण घेतलेलं नाही पोस्टात नोकरी करून त्यांनी चित्रकला जोपासली स्वतःला आवडतील त्या विषयावर मुक्तपणे रेखाटन करणे आणि बऱ्याचदा काळ्या शाईचा पेन, ब्रश क्वचित वेळेला आवश्यकता असेल तर इतर रंग ते वापरतात. काळ्या रेषेतली रेखाटने ही त्यांची खरी ओळख. पु. ल. देशपांडे, निळू फुले, सदाशिव अमरापूरकर यासारख्या दिग्गजांचा त्यांना सहवास लाभला आहे. 'आदिम' या अनियत कालिकाचे संपादन देखील त्यांनी केले आहे. ते उत्तम कवीही आहेत सुप्रसिद्ध साहित्यिक, नाटककार विजय तेंडुलकर यांनी १९८७ ला दूरदर्शनवर. 'दिंडी' या मालिकेत 'श्रीधर अंभोरे आणि त्यांची चित्रे' हा भाग चित्रित केला होता. यावरून त्यांच्या महतीची कल्पना आपल्याला येऊ शकते.इतर पुरस्कारांसोबत राष्ट्रीय पातळीवरील 'फाय फाउंडेशन' हा अतिशय मानाचा पुरस्कार त्यांना मिळाला आहे.' द विजुअल आर्ट मॅप ऑफ महाराष्ट्र: इन सायक्लोपीडिया ऑफ विजुअल आर्ट हिस्टरी' मध्ये त्यांची चित्रकार म्हणून नोंद आहे. हा फार मोठा गौरव आहे

अंभोरे यांची रेषा प्रवाही असून ती मुक्तपणे संचार करते.तिला वास्तवतेची भीती नाही, यथार्थ दर्शन आणि शरीर शास्त्र यांना ती जुमानत नाही. लहान मुलांच्या रेषेसारखी ती निरागस आहे, त्यामुळेच ती जिवंत वाटते आणि भावते. ही रेषा सुलभिकरणात्मक (सिंपलिसिटी) असते, तर कधी नटून थटून नक्षीदार होऊन भुरळ घालते.त्यांच्या रेषेला चिंतनाचा पीळ आहे.

आपणास चित्रकला महाविद्यालयात प्रवेश घेऊन शिकायला मिळाले नाही, याबद्दल खंत वाटते का? यावर अंभोरे म्हणतात, ''उलट बरेच झाले, नाही तर मी





अभ्यासक्रमात अडकलो असतो, एखाद्या चौकटीत बंदिस्त झालो असतो''. याचा कुणी उलट अर्थ घेऊ नये. चित्रकलेवरचं वाचन मात्र त्यांचं भरपूर आहे, चिंतन आहे. पुस्तकांची मुखपृष्ठ, कथाचित्र,निमंत्रण पत्रिका, स्टेज सजावट अशा विविध कामात त्यांची सर्जनशीलता दिसून येते.

अंभोरेंच्या चित्रात डेरेदार झाडांच्या वरच्या टोकांवर शांतपणे बसलेली पाखरं लक्ष वेधून घेतात, झाडांच्या रेखाटनात, उंच झाड, ठेंगणे झाड,भरगच्च पानांचे कधी विरळ पानांचे झाड अशी विविध रूप दिसतात. नदीचे पात्र,संथ पाणी, खळखळते पाणी, तरंग या सारखे बारीक तपशील ते रेषेतून सहज दाखवतात. दगडांचेही तसेच छोटा दगड, प्रचंड मोठे दगड, खडबडीत तर कधी गुळगुळीत... माणसांची विविधता तर त्यांच्यातला निरीक्षक अधोरेखित करणारा आहे.खेड्यातली माणसे यात स्त्री-पुरुष मुलं सर्वच येतात खास करून मजूर वर्ग शोषित स्त्रिया, विहिरी भोवती डोक्यावर घागरी घेऊन जाणाऱ्या, येणाऱ्या काळ्याकुट्ट, बोजड कधी कृश... डोक्यावर भला मोठा भारा घेऊन चालणाऱ्या... शेतात खुरपं घेऊन कामात दंग असणाऱ्या... अशा अनेक स्त्रिया बघितल्या की अंभोरेंची रेषा ही किती संवेदनशील आहे याचा प्रत्यय येतो. दुःख, वेदना हा त्यांच्या चित्रातला स्थायी भाव आहे.आई आणि मुल या विषयातल्या चित्रात ममत्व, वात्सल्य सहज दिसून येते. अंभोरेंनी चितारलेले बुद्धाची अनेक रूपे क्वचितच कुणी चितारली असतील: एका पर्वतावर बुद्ध उभा आहे,वाऱ्याने अंगावरचे वस्त्र उडत आहे... पर्वतावर उभा असतानाही बुद्ध भव्य आणि विलोभनीय वाटतो. दुसऱ्या चित्रात बुद्ध उभा असून डोक्याच्या मागे वलयात पक्षी उडतायेत, एका हातावर पक्षी तर दुसऱ्या कमळ... वैशिष्ट्यपूर्ण मांडणीमुळे हे चित्र परिणामकारक ठरते... झाडाखाली बुद्ध शांतपणे बसलेला भोवती कमळाची फुले आणि अनेक दगडांवर पक्षी बसलेले असून सर्व बुद्धाच्या दिशेने पाहत आहेत... यातून प्रेम भावना छान प्रकट होते. अशा नानाविध प्रकारे बुद्ध दिसत जातो... विरूपीकरणात्मक कधी अतिशयोक्तीतून पण सौंदर्यात्मकपणे अंभोरे हे सर्व रेखाटतात. बुद्धाबरोबरच तुकारामही वेगळा ठरतो. तो संतरूपातला कमी आणि मानवरूपातला जास्त असा दिसत जातो...

मेंढपाळ या विषयात ते पुरुष मेंढपाळा सोबत स्त्री मेंढपाळही चितारतात. अशी दृष्टी फार कमी चित्रकारांची असते. यात स्त्रीला विशिष्ट चेहरा नसल्यामुळे ती सार्वत्रिक ठरते. अंभोरेंना प्राण्यांविषयी विशेष लळा दिसतो ; माकडांची रेखाटने, बकऱ्या, मेंढया, गाय बैल इत्यादितून हे प्रामुख्याने जाणवते , स्त्री सौंदर्य दाखविण्यासाठी ते काही चित्रात वेलींच्या पानांचा वापर करतात, उदा. अंगावरील आभूषणे : नाकातली नथ, कानातल्या रिंगा किंवा गळ्यातले हार वगैरे. हा पानांचा साज – श्रृंगार बघतांना अंभोरेंची वेगळी दृष्टी कळून येते. दुःखी, कष्टी स्त्री जशी चित्रात दिसते ,

तशी ही लावण्यवतीही दिसते. पोतराज सारख्या निराळ्या विषयाचे चित्रण अंभोरे करतात. यात पोतराज स्वतःह्या भोवती गिरकी मारतो , यातला वेग आणि  रेषेतला जोरकसपणा अंभोरेंच्या रेषेतली ताकद दाखविणारा आहे .

अंभोरेंनी काढलेली दिवाळी अंकांची मुखपृष्ठ गाजलेली आहेत. २०२२ च्या 'शब्दशिवार' या अंकाच्या मुखपृष्ठावर चक्क गाईवर बसलेल्या तिन मुली, पाट्या घेऊन बसलेल्या दिसतात. त्या शाळेला निघालेल्या आहेत हे हातातल्या पाट्या आणि विशिष्ट गणवेशामुळे लक्षात येते . हे विचार करणारं, चकीत करणार आहे.शहरात सायकल , दुचाकी, बस किंवा रिक्षा या सारख्या वाहनांतून मुलं, मुली शाळेला जात असतात. आता तर हे चित्र खेड्यातही असेच दिसते. मग अंभोरेंनी हे असं चित्र का काढलं असेल ?..अकोला जिल्ह्यातल्या एका खेडयात पूर्वी कधीतरी एक प्रसंग पाहिला होता, तो प्रसंग असा होता की, फासे पारधी आपल्या मुलींना गाईच्या पाठीवर बसून, शाळेला निघाला होता ... हीच घटना अंभोरेंनी इथे आपल्या शैलीत रंगवलीय, असं हे निराळ  चित्र मनाला भावणार आहे. दुसरे मुखपृष्ठ : २०२३ चा दिवाळी 'शब्दशिवार' यात आदिवासी स्त्री केंद्रबिंदू आहे. आदिवासी समाजात स्त्रीला वरचे स्थान आहे तिला शुद्ध नजरेने बघतात. याच संकल्पनेवर आधारीत हे चित्र आहे. स्त्री मध्ये निसर्गासारखी अनेक रूपं लपलेली असतात ; म्हणून ती बहुरंगी दाखवून, स्त्रीचे अंग पांढऱ्या रंगात दाखविले आहे.  शुद्धता प्रतित होण्यासाठी पांढरा रंग येथे घेण्यात आला आहे . अतिशयोक्ती आणि विरुपीकरणाचा हा सुंदर असा नमुना म्हणावयास हवा, हे डोळ्यांना सुखावणारे आहे . अतिशय बहारदार असे हे मुखपृष्ठ झाले आहे .

साहित्यावर आणि कलेवर बोलताना अंभोरेंचा उत्साह ओसंडून वाहत असतो. तसेच प्रेमळ वागण्यामुळे त्यांचा मित्रपरिवार खूप मोठा आहे; त्यांच्यात ते रममान होताना दिसतात. 'श्रीधर रेषा' हे ज्येष्ठ साहित्यिक महावीर जोंधळे यांनी ललितपर लिहिलेलं पुस्तक म्हणजे, एखाद्या चित्रकारावर लिहिलेलं असं एकमेव पुस्तक असावं.

